**विलास कदम विरुध्द सोमु भोगावकर व इतर.**

## निशाणी क्र. १६ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी त्यांचा विना लेखी जवाबाचा आदेश रद्दबातल ठरवुन लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी मिळणेबाबत सादर केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात प्रतिवादीच्या वकीलांचे असे कथन आहे की, प्रस्तुतच्या प्रकरणात त्यांना कागदपत्रे न मिळाल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ व ५ चा लेखी जवाब दाखल करु शकले नाही व त्यामुळे त्यांच्या विरुध्द विना जवाबाचा आदेश पारीत झाला. प्रतिवादीच्या वकीलांनी पुढे असेही कथन केले की, आज रोजी प्रतिवादी त्यांचा लेखी जवाब दाखल करु इच्छीत आहे व त्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी जवाबाचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादीने त्यांना एक संधी देऊन विना लेखी जवाब आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

०३. वादीच्या वकीलांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दिले व असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादींनी जाणीवपुर्वक त्यांचा लेखी जवाब दाखल करणोसाठी वेळ लावलेला आहे. त्यामुळे, प्रतिवादीचा अर्ज खारीज करण्यात यावा.

०४. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी प्रस्तुतच्या अर्जामध्ये त्यांना सदरच्या प्रकरणामध्ये कागदपत्रे न मिळाल्याने त्यांनी त्यांचा लेखी जवाब अभिलेखावर दाखल करु शकले नाही असे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना दिनांक ११.०२.२०२२ रोजी सदरच्या दाव्यातील समन्स तामील करण्यात आली. त्यानंतर दिनांक १४.०२.२०२२ रोजी प्रतिवादी हे त्यांच्या वकीलामार्फत हजर झाले. परंतु त्यानंतर ते दिनांक ०४.०७.२०२२ पर्यंत त्यांनी त्यांचा लेखी जवाब अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे माझ्या पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक ०४.०८.२०२२ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या विरुध्द विना लेखी जवाब चालविण्यात यावा असा आदेश पारीत केला. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या तर्फे सादर करण्यात येत आहे असे स्पष्ट नमुद करण्यात येत आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी अर्जामध्ये असे कारण नमुद केले आहे की, त्यांना कागदपत्रे मिळाले नसल्याने

त्यांनी त्यांचा लेखी जवाब दाखल केला नाही व नमुद तारखेस न्यायालयात हजर राहु शकले नाही व त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या विरोधात विना लेखी जवाबाचा आदेश पारीत करण्यात आला.

**०५.** सदर प्रकरणातील अभिलेख तपासले असता असे दिसुन येते की, सदरचा दावा हा सन २०२२ मध्ये दाखल करण्यात आलेला असुन दिनांक ०४.०८.२०२२ रोजी प्रतिवादी क्र.४ व ५ विरुध्द विना लेखी जवाबाचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सदरचा दावा हा स्थाई प्रतिबंध हुकुमाबाबत असुन नैसर्गीक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही बाजु ऐकुण घेतल्यानंतर दावाचा निकाल देणे संयुक्तीक ठरेल त्याकरीता प्रतिवादींना अभिलेखावर आपले म्हणणे मांडु देण्याची एक संधी निश्चीतच देणे गरजेचे आहे. परंतु झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीवर आर्थीक स्वरुपात दंड लावणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश.**

**१.** अर्ज नि.क्र. १६ रुपये १००/- खर्चासह मंजुर करण्यात येतो. सदरचा खर्च तालुका विधी सेवा समिती, सेलु येथे जमा करण्यात यावा.

**२.** प्रतिवादी क्र. ४ व ५ विरुध्द दिनांक ०४.०८.२०२२ रोजी पारीत करण्यात आलेला विना लेखी जवाबाचा आदेश हा रद्द ठरविण्यात येतो व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना प्रस्तुत दाव्यात लेखी जवाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

**३.** प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर वरील आदेश अंमलात येतील व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना त्यांचा लेखी जवाब दाखल करता येईल.

Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2022.11.09 17:31:46 +0530

दिनांक ०९.११.२०२२.

**(मंदार मो. राऊत)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सेलू जि. परभणी